परिशिष्ट 'अ' योजना क्र.01

## कोविड कालावधीमध्ये कोविड मुळे दोन पालक गमावलेल्या किंवा कोविड मुळे एक पालक मयत झालेल्या मुलांच्या संगोपनाकरीता अर्थसहाय्य देणे.

योजनेचा उद्देश :- कोविड कालावधीमध्ये कोविड संसर्गामुळे दोन पालक गमावलेल्या किंवा एक पालक मयत झालेला आहे अशा मुलांना /त्यांचे संगोपन करणा-या सध्याचे पालकास अर्थसहाय्य देवून या मुलांचे सामाजिक व आर्थिक सक्षमिकरण करणे.

कार्यक्षेत्र :- नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र

प्रस्तावित लाभार्थी संख्या :- प्राप्त अर्जातील पात्र अर्जानुसार

अर्थसहाय्य रक्कम :-

| दोनही पालक गमावलेल्या बालकास मिळणारे अर्थसहाय्य | एक पालक गमावलेल्या बालकास मिळणारे अर्थसहाय्य |
|---|---|
| वय वर्ष 0 ते 5 - रू. 2000 प्रतिमहा | वय वर्ष 0 ते 5 - रू. 1000 प्रतिमहा |
| वय वर्ष 6 ते 10 - रू. 4000 प्रतिमहा | वय वर्ष 6 ते 10 - रू. 2000 प्रतिमहा |
| वय वर्ष 11 ते 18 - रू. 6000 प्रतिमहा | वय वर्ष 11 ते 18 - रू. 3000 प्रतिमहा |

लाभार्थी पात्रता

**कोविडमुळे मयत झालेल्या पालकांचे मृत्यू खालील चार प्रकारात विचारात धरण्यात येतील.**

1. दिनांक 1 मार्च 2020 रोजी किंवा त्यानंतर कोविड (कोविड-19) संसर्गामुळे ज्या बालकाचे दोन्ही पालक (आई आणि वडील) मृत्यू पावलेले आहेत अशी मुले.
2. दिनांक 1 मार्च 2020 रोजी किंवा त्यानंतर एका पालकाचा (आई किंवा वडील) कोविड-19 मुळे तर एका पालकाचा इतर कारणामुळे मृत्यू झाला असल्यास अशी मुले.
3. दिनांक 1 मार्च 2020 पूर्वीच एका पालकाचा (आई किंवा वडील) मृत्यू झाला असेल व दिनांक 1 मार्च 2020 रोजी किंवा त्यानंतर एका पालकाचा कोविडमुळे मृत्यू झाला असल्यास अशी मुले
4. दिनांक 1 मार्च 2020 रोजी किंवा त्यानंतर कोविड कालावधीमध्ये कोविड संसर्गाने एका पालकाचा मृत्यू झाला असल्यास

योजनेच्या अटी व शर्ती :-

**अ) मयत पालकाचा मृत्यू खालील नमूद परिस्थितीत व 1 मार्च 2020 नंतर झालेला असावा.**

1. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर रूग्णालयात दाखल असताना मृत्यू झाल्यास.
2. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यास व त्यानंतर 14 दिवस गृह विलगीकरण काळात मृत्यू झाल्यास.
3. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर रूग्णालयातून उपचार घेवून घरी परतल्यानंतर (डिस्चार्जनंतर) 07 दिवसांतील गृह विलगीकरणातील मृत्यू.
4. कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर रूग्णालयात उपचार घेवून घरी परतल्यानंतर पुन:श्च् कोविड उपचाराकरीता रूग्णालयात दाखल असताना झालेला मृत्यू.
5. कोविडमधून उपचार घेवून घरी आल्यानंतर म्युकरमायकोसिसमुळे घरी अथवा रुग्णालयातील वास्तव्य काळातील मृत्यू.
6. कोविड सदृश्य लक्षणे असल्यामुळे (covid suspect) रूग्णालयात दाखल असतानाचा मृत्यू

**ब) अर्ज, मुल स्वत:, त्यांचे संगोपन करणारे सध्याचे पालक किंवा संगोपन करणारी संस्था करु शकतील.**

**क) अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे.**

- मयत पालकांचे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मृत्यूपूर्वी मागील लगतच्या किमान 03 वर्षाचे वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून मालमत्ता धारक असल्यास मागील लगतच्या वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती/ निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ वीज बिल/ आधार कार्ड/ भाडे करारनामा/ पारपत्र (Pass Port)/ रेशनकार्ड / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल. (यापैकी 1 पुरावा)
- मयत पालकांचे मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- मुलाच्या जन्म दाखल्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- उपलब्ध असल्यास; शाळेत जात असल्याचा पुरावा.
- असल्यास संबंधीत मुलाचे आधारकार्ड ची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

- अर्जासमवेत RTGS साठी बँकेचे पासबूकची अथवा रद्द धनादेशाची (Cancelled Cheque) छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- अर्जासोबत अर्जदाराने संबंधीत मुलाचा व अर्जदारांचा पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक आहे.
- मयत पालक कोविड पॉझिटिव्ह असल्याचा अहवाल / कोविड संशयित रूग्णालयात दाखल असताना झालेला मयत संदर्भात रुग्णालयाचे मृत्यू प्रमाणपत्र / घरी मुत्यु झाल्यास कोविड मृत्युचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे / रुग्णालयामधून घरी गेल्यानंतर 07 दिवसात मृत्यू झाला असल्यास रुग्णालयाचे डिस्चार्ज कार्ड.
- अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे स्व:साक्षांकीत केलेली असावीत.

**5) केंद्र शासन, राज्य शासन, व नवी मुंबई महानगरपालिकेव्दारा राबविण्यात येणा-या इतर योजनांच्या लाभा व्यतिरिक्त या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.**

महिला व बालकल्याण योजना या घटका अंतर्गत तरतुदीमधून :- अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून